MHAU060000622004

**<u>नियमित दरखास्त क्र. १०/२००४ मधील नि.क्र. १५९,१६२ व१६५ खालील आदेश</u>**

**<u>विठाबाई शंकर भोजणे वि.गोबा लालचंद पवार व इतर</u>**

१. सदर अर्ज धनको याने वाद मिळकतीचा ताबा वारंट व पोलिस मदतीच्या आदेशासोबत तालुका उप–अधिक्षक भुमी–अभिलेख यांची नियुक्ती करुन दावा मिळकत क्षेत्राचे हद्दी खुना जायमोक्यावर निश्चित करणेबाबत आदेश होणकरीता दाखल केलेला आहे.

२. धनको यांचे थोडक्यात कथन असे की, धनको याने सदरची दरखास्त वाद मिळकतीचा ताबा मिळणेकरीता दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात निशाणी १३४ वर ताबा वारंट चा व पोलिस संरक्षण देणेबाबतचा अर्ज मंजुर करण्यात आलेला आहे. सदर प्ररकणात न्यायालयीन बेलीफ व पोलिस कर्मचारी हे जमीन गट क्र. १२६ चा ताबा देण्याकरीता जायमोक्यावर गेले असता सदर ठिकाणी हद्दी, खुना पुर्वीच्या मोजणीदाराने निश्चित केलेल्या दिसुन आल्या नाही असा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. यापुर्वी ताबा देणेकामी मोजणी फि धनको याने माननिय न्यायालयात भरणा केलेली आहे. परंतु सदर प्रकरणात काही काळ वरिष्ट न्यायाल्याचे स्थगिती आदेश असल्याने पुर्वीची मोजणी प्रक्रिया ताबा देणेबाबतची पुर्ण झालेली नाही. करीता सदर प्रकरणात पुर्वीचे मोजणी फि प्रमाणे तालुका उप–अधिक्षक भुमि–अभिलेख यांची प्रकरणात फेर नियुक्ती करुन दावा मिळकत क्षेत्राचे हद्दी, खुना जायमोक्यावर पुर्वीच्या मोजमापानुसार हददी, खुना शोधुन त्या निश्चित करणेबाबत आदेश होउन पोलिस मदतीसह ताबा वारंट मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

३. सदर अर्जावर ऋणको यांनी निशाणी १६१ कडे आपले म्हणणे दाखल करुन असे

कथन केले आहे की, सदर प्रकरणात निशाणी १३४ कडे झालेला आदेश हि निर्विवाद बाब आहे. परंतु सदर प्रकरणात वाद मिळकतीच्या चतुसिमा मिळालेल्या नसल्याकारणाने वाद मिळकतीचे मोजमाप करता आले नाही. त्यामुळे यापुर्वी केलेल्या मोजमाप सदर प्रकरणात ग्राहय धरता येणार नाही. धनको यांनी गट क्र. १२६ च्या मोजणीसाठी कोणताही अर्ज दिलेला नाही. तसेच धनको यांनी यापुर्वी केलेल्या मोजणीच्या हद्दी, खुना व चतुसिमा बाबत स्पष्ट उल्लेख केलेला दिसुन येत नाही. सबब, सदरचा अर्ज कायदेशीर नसुन सदरचा अर्ज नामंजुर करण्यता यावा अशी विनंती केलेली आहे.

४. ऋणको यांनी निशाणी क्र.१६२ कडे दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ४७ अन्वये आक्षेप अर्ज नोंदवुन असे कथन केले आहे की, सदर प्रकरणात निशाणी १५८ कडे वाद मिळकतीच्या नमुद केलेल्या चतुसिमा या सदर दरखास्त दाखल केलेल्या वाद मिळकतीच्या चतुसिमाशी विसंगत आहेत. ऋणको यांनी पुढे असे कथन केले आहे की,गट क्र. १२६ मधील क्षेत्र ४ हेक्टर २५ आर या मिळकतीकरीता साहेबराव भोजणे यांच्या नावाची नोंद फेरफार क्र. ९६० ने झालेली आहे. साहेबराव भोजणे यांनी गट क्र. १२६ मधील मिळकत कांताबाई भोजणे, दिलीप भोजणे, श्रीकांत भोजणे यांना प्रत्येकी १ हेक्टर २० आर वाटुन देउन तसे वाटणीपत्रक दिनांक ११.०६.२०२० रोजी तयार केलेले आहे. सदर वाटणी पत्रकाप्रमाणे साहेबराव भोजणे यांनी दिनांक १२.०८.२०२० रोजी तहसिलदार यांच्याकडे फेरफाराकरीता अर्ज दाखल केलेला आहे. दिनांक ११.०६.२०२० रोजीच्या वाटणीपत्रकाप्रमाणे साहेबराव भोजणे व गट क्र. २६ मधील कोणतीही मिळकत सध्या धनको यांच्या नावे अस्तीत्वात राहीलेली नाही. सदर वाटणीपत्रकाप्रमाणे साहेबराव भोजणे यांनी संपुर्ण वाद मिळकत कांताबाई भोजणे, दिलीप भोजणे व श्रीकांत भोजणे यांना विक्री केलेली आहे. सबब, ऋणको याने निशाणी १६५ कडे कागद यादी दाखल करुन दिनांक ११.०६.२०२० रोजी चे वाटणीपत्र फेरफार, तलाठी यांचा अहवाल, दिनांक १५.०५.२०२३ रोजीची नोटीस,तसेच साहेबराव भोजणे यांनी फौजदारी खटला क्र. १२२/२०१४ मध्ये दिलेल्या शपथपत्राची प्रत दाखल करुन तोंडी व लेखी पुरावा सादर करण्याची परवानगी मागीतलेली आहे. सदर अर्जावर धनको यांनी निशाणी १६४ कडे

आपले म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, ऋणको यांनी केलेल्या कथनात काही एक तथ्य नाही. ऋणको हे मोघम स्वरुपाचे अर्ज दाखल करुन मोजणी प्रक्रियेत अडथळा निर्माण करीत आहेत. यापुर्वी धनको यास मारहान करुन दावा मिळकतीचा ताबा घेउ दिलेला नाही याबाबतचा अहवाल संबंधीत बेलीफ ने दाखल केलेला आहे. सदर प्रकरणात चतुसिमेचा व मोजणी फि बाबत कुठलाही वाद राहीलेला नाही. वाद मिळकतीबाबत फेरफार क्र. ९६० मंजुर आहे तो केवळ माननिय सर्वोच्च न्यायालयातुन प्रकरणात सर्व अपील, रिट संपुष्टात आल्याचे अनुषंगाने माननिय तहसिलदार यांनी घेतलेला आहे. त्यावरुन वाद मिळकत क्षेत्राबाबत ताबा दिला व वाद मिळकत क्षेत्र वाटपासाठी शिल्लक राहीले नाही असा अर्थ काढणे न्याययोग्य होणार नाही. सबब, ऋणको यांचे अर्ज नामंजुर करुन धनको यांचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केलेली आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले, दोन्ही विधीज्ञाचे युक्तीवाद ऐकले.

६. सदर दरखास्त ही वाद मिळकतीचा ताबा मिळणेकरीता दाखल केलेली आहे. सदर दरखास्तीत यापुर्वी निशाणी १३४,१३६,१४८ व १५१ कडे धनको व ऋणको यांचे वाद मिळकतीच्या चतुसिमेबाबत, आक्षेप व सदर दरखास्तीत पुरावा दाखल करण्याच्या अर्जावर सखोल युक्तीवाद ऐकुन निशाणी १३४,१३६,१४८ व १५१ वरील अर्ज गुणदोषावर न्यायनिर्णयीत करण्यात आलेले आहेत. तसेच निशाणी १३४ मंजुर करुन पोलिस संरक्षणासह ताबा वारंट काढण्यात आलेला आहे. सदर दरखास्तीमध्ये यापुर्वी निशाणी ८५ कडे कोर्ट कमिशर म्हणुन उप–अधिक्षक भुमी–अभिलेख कन्नड यांनी वाद मिळकतीची मोजणी करुन तसा अहवाल चतुसिमेसह दाखल केलेला आहे.सदर निशाणी १३४ कडे मोजणीअहवाला प्रमाणे ताबा वारंट काढण्यात आला असता संबंधीत बेलीफ याने निशाणी कडे अहवाल दाखल करुन असे कथन केले आहे की, धनको दाखवित असलेल्या वादग्रस्थ जमीनीचे बांध व मोजणीच्या खुना अंदाजे नउ ते दहा वर्षापुर्वीचे असल्याने निश्चित व अचुक खात्री होत नाही त्याकरीता मोजणीदार अधिकारी कर्मचारी असणे जरुरीचे आहे

जेणेकरुन वारंटमधील दर्शविल्याप्रमाणे गट क्र. १२६ मधील मिळतीचा ताबा देणे सोयीचे व निश्चित खात्रीचे होईल. सदर बेलीफ अहवालाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, बेलीफ यांना वाद मिळकतीच्या चतुसिमा निश्चित करण्यास अडचण निर्माण होत आहे त्यामुळे त्यांना वाद मिळकतीचा ताबा देण्यास अडचण निर्माण होत आहे. सदर दरखास्तीत यापुर्वीच वाद मिळकतीचा ताबा पोलिस संरक्षणासह देण्यात आलेला आहे. त्यामुळे ऋणको यांनी दाखल केलेला आक्षेपाचा या स्थितीत विचार करता येणार नाही कारण यापुर्वी सदर दरखास्तीत अनेक वेळा ऋणको यांनी असे अर्ज दाखल केलेले आहेत. तसेच ऋणको यांनी दाखल केलेले सर्व अर्ज यापुर्वी गुणदोषावार न्यायनिर्णयीत केलेले आहेत. सदर अर्जात धनको यांनी असे कथन केलेले दिसुन येते की, यापुर्वी ताबा देणेकामी मोजणी फिस धनको यांनी माननिय न्यायालयात भरणा केलेली आहे. परंतु सदर प्रकरणात काही काळ वरिष्ट न्यायालयाचे स्थगिती ओदश असल्याने पुर्वीची मोजणी प्रक्रिया ताबा देणेबाबतची पुर्ण झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणात पुर्वीचे मोजणी फि प्रमाणे तालुका उप–अधिक्षक भुमी–अभिलेख यांची प्रकरणात फेर नियुक्ती करुन वाद मिळकतीच्या हददी, खुना शोधुन निश्चित करण्यात याव्या. सदर प्रकरणात धनको यांनी यापुर्वी उप–अधिक्षक भुमी–अभिलेख यांच्याकडे फिस भरलेली आहे व त्यावेळी भरणा केलेल्या फि मध्ये सदरची आजरोजीची मोजणी होउन शकते याबाबतचा कोणताही सबळ पुरावा धनको यांनी दाखल कलेले नाही. त्यामुळे वादी कथन करीत असल्याप्रमाणे पुर्वी भरलेल्या फि मध्ये आजरोजीची मोजणी करण्याचे आदेश करणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. धनको यांचा निशाणी १५९ अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

२. ऋणको यांचा निशाणी १६२ व १६५ कडील अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

३. तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, कन्नड यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करण्यात येते.

४. कोर्ट कमिशनर यांनी यापुर्वी केलेल्या निशाणी ८५ कडील पंचनामा व अहवालाप्रमाणे

दावा मिळकत मौजे सितानाईक तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथील जमीन गट क्र. १२६ ची मोजणी सर्व्हे मॅन्युअलमधील तरतुदीनुसार व दिसते परिस्थितीवरुन मोजणी करुन वाद मिळकत धनकोच्या ताब्यात देण्यास मदत करावी.

५. धनको यांना असे आदेशीत करण्यात येते की, त्यांनी आवश्यक ती मोजणी फी तालुका निरीक्षक,भूमी अभिलेख, कन्नड यांचेकडे भरावे.

६. धनको यांनी पोलिस भत्ता भरल्यानंतर पोलिस मदत देण्यात यावी.

Digitally signed by ANNAPURNA ISHWARA AWATI
Date: 2023.09.16 15:09:21 +0530

**(अ. ई. आवटी)**

**दिनांक–१५.०९.२०२३** **सह, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर (कोर्ट न.२)**

**कन्नड**

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | R. S.Takalkar |
| Court | : | A. I. Awati<br>Jt. C.J.J.D. & J.M.F.C, Kannad. |
| Date | : | 15.09.2023 |
| Order signed by the presiding officer on | : | 15.09.2023 |
| Order uploaded on | : | 16.09.2023 |
| Order is digitally signed on | : | 16.09.2023 |

..............................................................................